Estd. 1962

"A++" A ccredited by NAAC (2021)

With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**संदर्भ :- जा.क्र.आस्थापना-२/५४ दि. ३०/०४/२०२५**

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक / शिक्षकेत्तर अधिकारी व सेवकांसाठी शासन निर्णयातील फक्त पाच गंभीर आजारांसाठीच वैद्यकीय तसलमात मंजूर करण्यात येणार आहे. तसेच तसलमात रक्कमेचे समायोजन कशाप्रकारे करावे याबाबत कळविण्यात आलेले आहे.

आता, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार वैद्यकीय तसलमात रक्कमेबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) विद्यापीठ वेतन अनुदान योजनेखालील शिक्षक तसेच वर्ग १ व २ मधील अधिकारी यांना त्यांच्या मागणीनुसार तसेच डॉक्टरांनी दिलेल्या खर्चाच्या प्रमाणपत्रानुसार शासन निर्णयातील फक्त पाच गंभीर आजारासाठीच रू. १,५०,०००/- पर्यंत वैद्यकीय तसलमात देण्यात येईल.

२) विद्यापीठ वेतन अनुदान योजनेखालील वर्ग ३ व ४ मधील शिक्षकेत्तर सेवकांना त्यांच्या मागणीनुसार तसेच डॉक्टरांनी दिलेल्या खर्चाच्या प्रमाणपत्रानुसार पाच गंभीर आजारासहित इतर २८ आकस्मिक आजारांकरीता रू. १,५०,०००/- पर्यंत वैद्यकीय तसलमात देण्यात येईल.

३) तसलमात रक्कम दिल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत देयके सादर करावीत. अखर्चित रक्कम रूग्णास डिस्चार्ज दिल्यानंतर ७ दिवसांत विद्यापीठ कार्यालयात जमा करावी अन्यथा लेखा संहितेनुसार दंड लागू करण्यात येईल.

४) वैद्यकीय तसलमात घेतल्यापासून वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक कार्यालयास एक वर्षाच्या आंत प्राप्त न झाल्यास घेतलेली तसलमात रक्कम १२ हफ्त्यात वेतनातून वसूल करण्यात येईल.

सदरचे परिपत्रक विद्यापीठ वेतन अनुदान योजनेखालील वर्ग ३ व ४ मधील शिक्षकेत्तर सेवकांना दि.२१/०२/२०२६ पासून लागू करण्यात येत आहे.

कुलसचिव

**जा.क्रं. - आस्थापना-२/197** दिनांक - 9 MAR 2026

**प्रति,**

**१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

**२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.**

**३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक www.unishivaji.ac.in/intranet** - Category - Medical Reimbursement Form **या सदरात प्रसिध्द करावे.**

**प्रत :- माहितीस्तव.**

**मा.प्रभारी कुलगुरू, मा. प्रभारी प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, तसेच मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय**